# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर - वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट :- ४०१/२०२३ दिनांक – २२/११/२०२३

## मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालयातील भरोसा सेलच्या स.पो.नि. तेजश्री शिंदे यांना पहिला बाल स्नेही पुरस्कार - २०२३

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व महिला व बाल विकास विभाग, युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २२/११/२०२३ रोजी पहिला राज्यस्तरीय कार्यक्रम मुबंई येथे यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईंट मुबंई येथे सकाळी १०.३० ते १३.३० या कालावधीत आयोजित केलेला होता. राज्यात बालकांच्या सर्वांगीण विकास, बाल विकास हक्क संरक्षण, त्यांची सुरक्षा, व आरोग्य इत्यादी अनेक महत्वपुर्ण विषायावर अनेक प्रशासकीय यंत्रणा, बालगृह, बालकल्याण समिती इत्यादी यंत्रणासंस्था या सकारात्मक पध्दतीने मौलाचे कार्य पार पाडत आहेत. अशा व्यक्ती/संस्थांना “बालस्नेही ” पुरस्काराने संन्मानित करण्यासाठी महाराष्ट्र राज्य आयोग व महिला व बालविकास विभाग, युनिसेफ यांचे संयुक्त विद्यमाने प्रथमच कार्यक्रम पार पडला आहे.

सर्व पोलीस आयुक्तालय व सर्व पोलीस परिक्षेत्र, विशेष पोलीस महानिरीक्षक/पोलीस उप महानिरीक्षक यांचे विभागातुन प्रत्येकी ०१ अधिकारी/अंमलदार यांनी वर नमुद श्रेणीनुसार उत्कृष्ट कामगिरी केली असल्यास त्यांची नामांकने कामगिरीसह मागवण्यात आलेली होती.

कामगिरी – मिरा भाईदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात, सहाय्यक पोलीस निरीक्षक, तेजश्री शिंदे, यांनी बालकांचे होणारे लैंगिक शोषण व इतर गुन्हयाबाबत बालकामध्ये जनजागृती करण्यासाठी “कायदयाचे धडे” हा उपक्रम शालेय विद्यार्थ्यांकरिता तसेच रहिवाशी करीता राबविण्यात आला आहे. या उपक्रमार्तंगत ७५ कार्यक्रम घेण्यात आले असून अंदाजे ४० शाळा व २५ हजार विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आले आहे. याकरीता सपोनि तेजश्री शिंदे, नेमणुक भरोसा सेल, मिरा-भाईदर, वसई विरार आयुक्तालय येथुन नांमाकन पाठवण्यात आलेले होते.

भरोसा सेलचा दिनांक ०१ ऑक्टोंबर २०२३ रोजी २ रा वर्धापन दिन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमात २ वर्षे उत्कृष्ट कामगिरी केलेबाबत पोलीस आयुक्त मिरा भाईदर वसई विरार यांनी दिनांक १३/१०/२०२३ रोजी सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री शिंदे यांना प्रसंशापत्रक देवून गौरव केला होता.

दिनांक २२/११/२०२३ रोजी यशवंतराव चव्हाण सभागृह, नरिमन पॉईंट येथील पहिला बालस्नेही पुरस्कार या राज्यस्तरीय कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन ॲड. सुशीबेन शाह, अध्यक्षा महाराष्ट्र राज्य बाल व हक्क संरक्षण आयोग, व प्रमुख पाहुणे म्हणुन कु. आदिती तटकरे मा. मंत्री महिला व बाल विकास महाराष्ट्र राज्य तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. दिपक पांडेय महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग महाराष्ट्र राज्य मुबंई हे लाभले होते.

महाराष्ट्र राज्य बाल व हक्क संरक्षण आयोग, महिला व बालविकास आयुक्तालय, युनिसेफ यांचेकडुन बालकांचे क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबध्दल “पहिला बाल स्नेही पुरस्कार - २०२३ ” सहाय्यक पोलीस निरीक्षक, तेजश्री शिंदे, भरोसा सेल मिरा भाईदर वसई विरार यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आलेला आहे.








----------------------------------------------------------------------